| सीएनआर.क्र.एमएचबीयु १५०००६७८२०२१ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १७/०७/२०२१. | | |
| | नोंदणी दिनांक | : | १७/०७/२०२१. | | |
| | निकाल दिनांक | : | १२/०५/२०२६. | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०९ | २५ |

**भाग-अ**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी : श्री. एम. एस. भरड)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.३१८/२०२१.** **निशाणी क्र.१७.**

**देऊळगावराजा पोलिस ठाणे गु.र.नं.१५२/२०२०,**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत : पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे अंढेरा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | : | श्री. ए.एस. शेळके |
| | | **विरुध्द** |
| आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | **सुनिल भगवान तांबेकर,**<br>वय ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>रा. सावखेड नागरे, ता. देऊळगावराजा,<br>जि. बुलडाणा. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | : | श्री. आर.बी. रामाणे |

**भाग-ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १७/०५/२०२० |
| गुन्हा दाखल दिनांक | : | १७/०५/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | १७/०७/२०२१ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | : | १५/०९/२०२५ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | : | १५/०९/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | : | १२/०५/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १२/०५/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | : | – |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | सुनिल भगवान तांबेकर, | १५.०९.२०२५ | १५.०९.२०२५ | भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ | निर्दोष | - | - |

## भाग-क
## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | सौ. वच्छला भगवान तांबेकर | फिर्यादी |
| २. | भगवान किसन तांबेकर | साक्षीदार |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम. आर. क्र. ९६/२०२० | एक आडजात काठी |

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक : १२/०५/२०२६ रोजी घोषीत)

आरोपी हा भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे खटल्यास सामोरे जात आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीगत पुढीलप्रमाणे :-**

**२.** सदर खटल्यात सौ. वच्छला भगवान तांबेकर हे फिर्यादी आहेत. त्यांनी अशी आशयाची फिर्यादी दिली की, दि.०७/०५/२०२० रोजी ०८.०० वाजणेचे सुमारास मौजे सावखेड नागरे, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा गावचे हद्दीत फिर्यादी जेवन करून घरी आराम करीत असतांना सुनिल घरी आला व म्हणाला की "तुम्ही संध्याला तुमचे सोबत का ठेवता" असे म्हणुन फिर्यादीसोबत वाद घालु लागला फिर्यादी यांनी सुनिलला सांगीतले की "संध्याचा पती तिला दारू पिऊन खुप त्रास देतो म्हणुन ती माहेरी आलेली आहे" असे त्यास सांगीतले असता त्याने फिर्यादीचे पती भगवान तांबेकर यांना शिवीगाळ करणेस सुरवात केली. त्यास शिवीगाळ करू नको असे म्हटले असता घरासमोर पडलेली काठीने फिर्यादीच्या पतीस मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या पतीचे डोके फुटुन रक्त निघाल्यामुळे. त्यांनी आरडा-ओरड केली असता फिर्यादीची नणंद सरस्वती किसन तांबेकर व मुलगी संध्या व इतर काही लोक यांनी फिर्यादीच्या पतीला सुनिलचे तावडीतुन सोडविले असता सुनिलने नणंद सरस्वती बाई मुलगी संध्या व इतरांना जिवाने मारण्याची धमकी दिली. करिता, फिर्याद असे.

**३.** प्रस्तुतची फिर्याद **गु.र.नं.१५२/२०२०** अन्वये नोंदविण्यात आला व पुढील तपास तपासी अंमलदार पो.ना. संदिप पाटिल, अंढेरा पोलीस ठाणे यांचेकडे सुपुर्द करण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. दोन

पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून आरोपीकडून एक आडजात काठी जप्त केला. तसेच जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपीला अटक केली. तपासा अंती आरोपीविरुध्द गुन्हादर्शक तथ्य मिळून आल्याने सदरील दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप **निशाणी-८** प्रमाणे निश्चित केले. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून दाखविले असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुरावा आणि उभय पक्षाच्या विधीज्ञांचा मौखिक युक्तीवाद ऐकला, त्यावरुन खालील मुद्दे निश्चित करुन त्याचा निष्कर्ष कारणमिमांसावरुन खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दि.१७/०५/२०२० रोजी सकाळी २०.०० वाजणेचे सुमारास मौजे सावखेड नागरे, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा हद्दीतील आरोपी याने फिर्यादीच्या पतीस आडजात काठी मारून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली का ? | : | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या पतीला उद्देशपूर्वक अपमान व्हावा व त्याला शांतताभंग करण्यास प्रक्षोभन मिळावे या उद्देशाने किंवा तशा कृत्याने त्यांचा अपमान होऊन शांतताभंग करण्यास प्रक्षोभन मिळण्याचा संभव असल्याची माहिती असताना बिभत्स भाषेत शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले का ? | : | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या पतीला जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध केला का ? | : | **नकारार्थी.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | : | **आरोपी याची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**६.** आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने **साक्षीदार क्र.१** –

**सौ. वच्छला भगवान तांबेकर,** (फिर्यादी) यांना **निशाणी-१५** आणि **सा.क्र.२ भगवान किसन तांबेकर,** (साक्षीदार) **निशाणी १६** वर तपासले आहे. फिर्यादीने नि.क्र. १२ वर लेखी पुरसिस देऊन त्यांना इतर साक्षीदार तपासावयाचे नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे नि.क्र. १२ अन्वये व अभियोग पक्षाच्या तोंडी विनंतीवरून नि.क्र. १ वर सविस्तर आदेश पारित करून पुरावा बंद करण्यात आला.

**७.** अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हादर्शक तथ्य आढळून न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :-**

**८.** मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन सोयीसाठी एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

**९.** फिर्यादी व आरोपीने **निशाणी-११** प्रमाणे तडजोडपत्र दाखल केले आहे, परंतु सदरचे गुन्हे तडजोडीस अपात्र असल्यामुळे तडजोड मान्य करण्यात आली नाही.

**१०.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी **सौ. वच्छला भगवान तांबेकर,** (फिर्यादी) यांना **निशाणी-१५** वर नोंदवली असुन सदर साक्षीदाराने तिच्या साक्षीमध्ये घटना कधी, कोठे, केंव्हा व कशी घडली याबाबतीत माहित नसल्याचे नमुद केलेले आहे. वरील सर्व नमुद साक्षीदार हे त्यांच्या पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्यांना उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ता द्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील फिर्यादीने घटना घडली नसल्याचे सांगून त्याला विचारलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

**११.** **सा.क्र.२ भगवान किसन तांबेकर,** (साक्षीदार) **निशाणी १६** वर नोंदवली असुन सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये घटना कधी, काय व केव्हा घडली हे त्यांना आठवत नाही असे सांगितले आहे. सदरील साक्षीदार त्यांच्या पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्याला उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ता द्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील साक्षीदाराने **अधारेखांकित भाग-अ** मधील घटना घडली नाही असे सांगितले व त्यांना विचारलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

**१२.** अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता जरी आरोपीने जखमीचे प्रमाणपत्र तसेच जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा मान्य केले असलेतरी फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्ष फिर्याद शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे, अभिलेखावरील पुरावा जशास-तसा गृहित धरला तरी सदरील पुरावा हा गुन्हयाची साखळी पुर्ण करण्यास व आरोपीस गुन्हयाशी जोडण्यास अपुरा आहे. जरी कायद्याची अशी स्थित परिस्थिती आहे की, एका साक्षीदाराचा पुरावा हा सत्यतेच्या कसोटीपुर्ण करणारा असावा लागतो. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे दप्तरी

तपासण्यात आलेल्या साक्षीदाराचा पुरावा सदरची कसोटी पुर्ण करण्यास अपुरा आहे. एकंदरीत अभियोग पक्षाने दि.०७/०५/२०२० रोजी ०८.०० वाजणेचे सुमारास मौजे सावखेड नागरे, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा गावचे हद्दीत फिर्यादी जेवन करून घरी आराम करीत असतांना सुनिल घरी आला व म्हणाला की "तुम्ही संध्याला तुमचे सोबत का ठेवता" असे म्हणुन फिर्यादीसोबत वाद घालु लागला फिर्यादी यांनी सुनिलला सांगीतले की "संध्याचा पती तिला दारू पिऊन खुप त्रास देतो म्हणुन ती माहेरी आलेली आहे" असे त्यास सांगीतले असता त्याने फिर्यादीचे पती भगवान तांबेकर यांना शिवीगाळ करणेस सुरवात केली. त्यास शिवीगाळ करू नको असे म्हटले असता घरासमोर पडलेली काठीने फिर्यादीच्या पतीस मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या पतीचे डोके फुटुन रक्त निघाल्यामुळे. त्यांनी आरडा-ओरड केली असता फिर्यादीची नणंद सरस्वती किसन तांबेकर व मुलगी संध्या व इतर काही लोक यांनी फिर्यादीच्या पतीला सुनिलचे तावडीतुन सोडविले असता सुनिलने नणंद सरस्वती बाई मुलगी संध्या व इतरांना जिवाने मारण्याची धमकी दिली या बाबी संशयाच्या पलीकडे शाबीत केली नाही. करीता मी **मुद्दा क्र.१ ते ३** चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिता :-**

**१३.** **मुद्दा क्र.१ ते ३** च्या **नकारार्थी** निष्कर्षाअंती मी **मुद्दा क्र.४** च्या निष्कर्षा दाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

| **आदेश** | |
|---|---|
| १) | आरोपी **सुनिल भगवान तांबेकर,** यांची **भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये** या गुन्ह्यातुन **फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१)** अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | या प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक आडजात काठी ही मुल्यहिन असल्यामुळे आव्हान कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा. |
| ४) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

MAHESH SUNILDATT BHARAD
Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2026.05.12 16:10:58 +0530

**(श्री. एम. एस. भरड)**

दिनांक : १२/०५/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१,
देऊळगावराजा, जि. बुलडाणा.

प्र मा ण प त्र

“ मी याची पुष्टी करतो की, सदरील पीडीएफ फाईलमधील प्रत्येक शब्द नी शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे सारखेस आहेत.”

लघुलेखकाचे नाव :- श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,

न्यायालयाचे नाव :- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, देऊळगावराजा.

आदेश/न्यायनिर्णयाचा दिनांक :-१२.०५.२०२६

श्रुतलेखनाचा दिनांक :- १२.०५.२०२६

तपासलेले आणि स्वाक्षरी दिनांक :- १२.०५.२०२६

अपलोड केल्याचा दिनांक :- १२.०५.२०२६

स्वा/-

(श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,)

लघुलेखक.